(२०१९-२०)

Rajdhani
DATE / /

ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार .– शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे.

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

## * प्रकल्प कार्य *

## इतिहास

प्रकल्पाचे नाव :- किल्ले पुरंदर

विद्यार्थीनीचे नाव :-

कु. मयुरी मोहन काळे.

वर्ग :- बी. ए. भाग-३.

रोल नंबर :- ५७५५.

मार्गदर्शक :- १) डॉ. एम. एस. घोरपडे.

२) डॉ. एस. आर. कट्टीमनी.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# प्रतिज्ञापत्र

मी असे प्रतिज्ञापत्र सादर करते की, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथील बी.ए भाग-३ ची विद्यार्थिनी आहे. इतिहास या विषयातील "किल्ले पुरंदर" या विषयातील हा प्रकल्प प्रा.डॉ. एम.एस घोरपडे व प्रा.डॉ. एस.आर कट्टीमनी यांच्या अमुल्य मार्गदर्शनाखाली पुर्ण केला असुन या अहवालातील माहिती मी स्वतः गोळा केली आहे. हा प्रकल्प अहवाल इतर कोणत्याही पुस्तकांची व इंटरनेट वरिल माहितीची नक्कल आढळल्यास विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, जी शिक्षा देईल ती मला मान्य आहे.

कु. मयुरी मोहन काके

VIVEKANAND COLLEGE
ESTD
JUNE
1964

DATE / /

# अनुक्रमणिका

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रं |
|---|---|---|
| 1] | प्रस्तावना | 1 |
| 2] | प्रतिज्ञापत्र | 2 |
| | किल्ले पुरंदरची माहिती | 5 ते 14 |
| | संशोधन पद्धती | 15 |
| | निष्कर्ष | 16 |
| | संदर्भ ग्रंथ | 17 |

VIVEKANAND COLLEGE ... ESTD JUNE 1964 (Autonomous)

# प्रस्तावना

इतिहास या विषयाचा प्रकल्प करत असताना अनेक विषय समोर आले. प्रकल्प हा अतिरिक्त ज्ञान वाढविण्याचे कारण की, इतिहास विषयाबद्दलची विद्यार्थ्यांना आवडी जास्त माहिती मिळावी. ऐतिहासिक वास्तू, किल्ले, गड यांना विद्यार्थ्यांनी भेटी देण्यात यावा व हेच समोर ठेवून केला आहे.

किल्ले पुरंदर हा विषय घेताना त्या किल्ल्यांविषयी अज्ञात असलेल्या लोकांना या किल्ल्यांची माहिती मिळावी, व अशा किल्ल्यांना भेटी दिल्याने त्यांच्याबद्दलची जिज्ञासा आपोआपच वाढते.

किल्ले हे इतिहासातील अतिशय महत्त्वाचा भाग आहे. किल्ले हि नुसती पर्यटन स्थळे नसून ती एक ऐतिहासिक वारसा आहे. त्यांचा अभ्यास करताना तेथील स्थानिक स्थळांचाही अभ्यास केला जातो.

ESTD
JUNE
1964

★ पुरंदर किल्ला हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे.

गुणक :- 18°10'N 73°8'55'E / 18.17°N 73.59°E

नाव :- पुरंदर किल्ले पुरंदर

उंची :- १५००मी.

प्रकार :- गिरिदुर्ग

चढाईची श्रेणी :- सोपी

ठिकाण :- पुणे जिल्हा, महाराष्ट्र, भारत

जवळचे गाव :- सासवड

डोंगररांग :- सह्याद्री

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

सध्याची अवस्था :-

स्थापना :- १३५०



## * पुरंदर किल्ला :-

पुरंदर किल्ला Purandar Fort – पुरंदर किल्ल्यांची उंची १५०० मीटर असुन हा किल्ला गिरिदुर्ग प्रकारात प्रकारात मोडतो. पुणे जिल्ह्यातील विसिंग डोंगर रांगेत हा किल्ला असुन ट्रेक च्या दृष्टीने अतिशय सोपा आहे.

सह्याद्रीच्या दक्षिणोत्तर पसरलेल्या मुख्य रांगेतून काही फाटे पूर्व दिशेकडे फुटले आहेत. त्यापैकी एका फाट्यावर सिंहगड आहे. तोच फाटा तसाच पूर्वेकडे अदमासे २४ कि.मी. धावून भुलेश्वर जवळ लोप पावतो. याच डोंगररांगेवर पुरंदर, वज्रगड वसलेला आहे. कात्रज घाट, बापदेव घाट, दिवे घाट हे तीन घाट ओलांडून पुरंदरच्या पायथ्याशी जाता येते. किल्ल्याला चौफेर माच्या आहेत. किल्ल्याचे स्थान १८.१८ अंश अक्षांश व ७४.३३ अंश रेखांश वर स्थित आहे. किल्ला पुण्याच्या आग्नेय दिशेला अंदाजे २० मैलांवर तर सासवडच्या नैऋत्येला ६ मैलावर आहे. गडाच्या पूर्वेला बहुतांशी प्रदेश सपाट आहे तर पश्चिमेला डोंगराळ प्रदेश आहे. वायव्येला १३-१४ मैलांवर सिंहगड आहे. तर पश्चिमेला १९-२० मैलांवर राजगड आहे. पुरंदर किल्ला तसा विस्ताराने मोठा आहे. किल्ला मजबूत असुन बचावाला जागा उत्तम आहे. गडावर मोठी शिबंदी राहू शकते. दारूगोळा व धान्याचा मोठा साठा करून गड दीर्घकाळ लढवता

JUNE 1964




## इतिहास -

अल्याड जेजुरी पल्याड सोनोरी वाटेत कऱ्हा पुरंदर शोभती शिवशाहीचा तुरा। असे पुरंदर किल्ल्याचे वर्णन केलेले आढळते. पुरंदरच्या पायथ्याशी नारायणपूर नावाचे गाव आहे. या गावात यादवकालीन धाटणीचे महादेवाचे मंदिर आहे. यावरून हा किल्ला साधारण १००० ते १२०० वर्षांपूर्वीचा आहे असे अनुमान निघते. पुरंदर म्हणजे इंद्र, ज्याप्रमाणे इंद्राचे स्थान बळकट तसाच हा पुरंदर आहे. पुराणात या डोंगराचे नाव आहे "इंद्रनील पर्वत". हनुमंताने द्रोणागिरी उचलून नेत असताना त्या पर्वताचा काही भाग खाली पडला, तोच हा इंद्रनील पर्वत. बहमनीकाळी बेदरचे चंद्रसंपत देशपांडे यांनी बहमनी शासनाच्या वतीने पुरंदर ताब्यात घेतला. त्यांनी पुरंदरच्या पुनर्निर्माणास प्रारंभ केला. त्याचे वंशज महादजी निळकंठ याने कसोशीने हे काम पूर्ण केले. येथील शेंद्री बुरुज बांधताना तो सारखा

ESTD JUNE 1964 (Autonomous)

Rajdhani

DATE / /

लासलगाव होता. तेव्हा बहिरनाक सोनकाळ याने आपला पुत्र नायनाक आणि सून देवकाई अशी दोन मुले त्यात गाडण्यासाठी दिली. त्याचा बळी घेतल्यामुळे तो बुरुज उभा राहिला. हा किल्ला सन १४८९ च्या सुमारास निजामशाही सरदार मलिक अहमद याने जिंकून घेतला. पुढे शके १५५० मध्ये तो आदिलशाहीत आला. इ.स १६४९ मध्ये आदिलशाहने शहाजीराजांना कैदेत टाकले. याच वेळी शिवाजी महाराजांनी अनेक आदिलशाही किल्ले आपल्या ताब्यात घेतले. म्हणून शिवरायांचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशाहने फत्तेखानास रवाना केले. परिस्थिती फारच बिकट होती. कारण आपले वडिल कैदेत होते तर दुसरीकडे फत्तेखानाच्या स्वारीमुळे स्वराज्य धोक्यात येणार होते. महाराजांनी यावेळी लढाईसाठी पुरंदर किल्ल्याची जागा निवडली. मात्र यावेळी गड मराठ्यांच्या ताब्यात नव्हता. महादजी निळकंठराव यांच्या ताब्यात किल्ला होता. त्यांच्या भावाभावातील भांडणाचा फायदा म्हणून महाराजांनी किल्ल्यात प्रवेश मिळविण्यात करण्यात यश मिळवले. या पुरंदर

(८) किल्ल्याच्या साहाय्याने मराठ्यांनी फत्तेखानाशी झुंज दिली आणि लढाई जिंकली. शिवाजी महाराजांनी या पहिल्या लढाईतच मोठे यश प्राप्त झाले. सन १६५५ मध्ये शिवाजी राजांनी नेताजी पालकर यास गडाचा सरनोबत नेमले. वैशाख शु.१२ शके १५८७ म्हणजेच १६६५ मध्ये मोगल सरदार जयसिंगाने पुरंदरला वेढा दिला. या युद्धाचे वर्णन सभासद बखरी मध्ये असे आढळते. "तेव्हा पुरंदरावरी नामजाद लोकांचा सरदार राजियाचा मुरारबाजी प्रभू म्हणून होता. त्याचबरोबर हजार माणूस होते. याखेरीज किल्ल्याचे एक हजारे असे दोन मा[illegible] हजारे लोक होते. त्यात निवडक करून मुरारबाजी याने सातशे माणूस घेऊन ते गडाखाली दिलेरखानावरी आले. दिलेरखान तालेदार [illegible] पठाण पाच हजार याखेरीज बैल वैगैरे लोक ऐशी फौज गडास चौतर्फा चढत होती. त्यात हेकुन सरमिसळ जाहले. तसेच बहिले मारले. "मुरारबाजी देशपांडे येचे हे शौर्य पाहून दिलेरखान बोलिला, "असे तु कौल घे. मोठा मर्दानी शिपाई तुज नावाजितो." ऐसे बोलिला मुरारबाजी बोलिला, "तुझा कौल म्हणजे काय? म्हणोनी नीट खानावरी खानावरी चालिला. खानावरी तलवारीचा वार करावा तो खानाने तीन तीर मारून पुरा केला. तो पडला. मग खानाने तोंडात आंगोळी घातली." असा [illegible] युद्धाने पैदा केला."

COLLEGE ... 1964

खानाने वज्रगड ताब्यात घेतला. आणि पुरंदरावर हल्ला केला. व पुरंदर माचीचा ताबा घेतला. माचीवर खानाचे आणि मुरारबाजीचे घनघोर युद्ध झाले. मुरारबाजी पडला व त्याचबरोबर पुरंदरही पडला. हे वर्तमान जेव्हा राजांना कळले तेव्हा राजांनी जयसिंगाशी तहाचे बोलणे सुरु केले. आणि ११ जून १६६५ साली इतिहास प्रसिद्ध 'पुरंदर तह' झाला. त्यात २३ किल्ले राजांना मोगलांना द्यावे लागले. त्यांची नावे अशी, १. पुरंदर २. रुद्रमाळ आणि वज्रगड ३. कोंढाणा ४. रोहिडा ५. लोहगड ६. विसापूर ७. तुंग ८. तिकोना ९. प्रबळगड १०. माहुली ११. मनोरंजन १२. कोहोज १३. कर्नाळा १४. सोनगड १५. पळसगड १६. भंडारगड १७. नरदुर्ग १८. मार्गगड १९. वसंतगड २०. नंगगड २१. अंकोला २२. खिरदुर्ग २३. मानगड ८ मार्च १६७० मध्ये निळोपंत मुजुमदाराने किल्ला स्वराज्यात आणला. संभाजी राजांच्या मृत्यूनंतर किल्ला औरंगजेबाने जिंकला. व त्याचे नाव 'आजमगड' ठेवले. पुढे मराठ्यांच्या वतीने शंकराजी नारायण सचिवांनी मोगलांशी भांडून पुरंदर घेतला. शके १६६५ मध्ये छत्रपती शाहू यांनी किल्ला पेशवे यांस दिला. अनेक दिवस किल्ल्यावर पेशव्यांची राजधानी होती. शके १६९७ मध्ये गंगाबाई पेशवे यांना गडावर

(5) मुलगा झाला, त्याचे नाव सवाई माधवराव ठेवण्यात आले. इ.स १७९८ मध्ये इंग्रजांनी गड आपल्या ताब्यात घेतला.

## ★ गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे :-

पुरंदर आणि वज्रगड जरी एकाच डोंगरसोंडेवर वसलेले असले तरी ते दोन स्वतंत्र किल्ले आहेत.

## ★ बालेकिल्ला :- बिनी दरवाजा :-

पुरंदर माचीवरील हा एकमेव दरवाजा. आपण नारायणपूर गावातून किल्ल्यावर जाताना हा दरवाजा लागतो. दरवाजा आजही चांगल्या स्थितीत आहे. दरवाज्यातून आत शिरल्यावर पहारेकऱ्यांच्या देवड्या आहेत. दरवाज्यातून आत शिरल्यावर दोन रस्ते लागतात. समोरच पुरंदरचा कडा आपले लक्ष वेधून घेतो. दरवाज्यातून आत शिरल्यावर दोन रस्ते लागतात; एक सरळ पुढे जातो तर दुसरा

डावीकडे मागच्या बाजूस वळतो. आपण सरळ रस्त्याने पुढे गेल्यास उतारावर लाकडाच्या बराकी आणि काही बंगले दिसतात. आणीबाणी एकंदर लांबी एक गेल आहे, तर रुंदी १०० ते २५० फूट आहे. आणखी पुढे गेल्यावर उजवीकडे बालेकिल्ल्याच्या पायथ्याशी एक मंदिर दिसते त्याचे नाव 'पुरंदरेश्वर'.

## * रामेश्वर मंदिर :-

पुरंदरेश्वर मंदिराच्या मागील कोपऱ्यात पेशवे घराण्याचे रामेश्वर मंदिर आहे. हे पेशव्यांचे खाजगी मंदिर होते. या मंदिराच्या थोडे वरती गेल्यानंतर पेशव्यांच्या दुमजली वाड्याचे अवशेष दिसतात. पेशवाईच्या आरंभी बाळाजी विश्वनाथाने तो बांधला. या वाड्यातच सवाई माधवरावाचा जन्म झाला. वाड्याच्या मागे विहीर आहे. आजही ती चांगल्या अवस्थेत आहे. येथून थोडे पुढे गेल्यावर दोन वाटा लागतात. एक वाट बालेकिल्ल्याच्या दिशेने वर जाते दुसरी खाली भैरवखिंडीच्या दिशेने जाते. आपण प्रथम बालेकिल्ल्याच्या दिशेने वर जाऊया. या वाटेने वर गेल्यावर १५ मिनिटातच आपण दिल्ली दरवाजापाशी पोहचतो.

## * खंदकडा :-

या दिल्ली दरवाज्यातून आत शिरल्यावर डावीकडे एक कडा थेट गेलेला दिसतो. हाच तो खंदकडा. या कड्याच्या शेवटी एक बुरुज आहे. बुरुज पाहून आल्यावर परत दिल्ली दरवाज्यापाशी यावे. येथून एक वाट पुढे जाते. वाटेच्या आजूबाजूला काही पाण्याची टाकी लागतात. थोडे पुढे गेल्यावर उजवीकडे एक उंचवटा लागतो. त्याच्या मागे जोत्यांचे अवशेष आहेत. येथेच कचेरी असल्याचे अवशेष दिसतात. थोडे वर चढून पाहिल्यास वाड्याचे अवशेष दिसतात. हे सर्व पाहून पुन्हा आपल्या वाटेला लागावे. वाटेवरून पुढे गेल्यावर काही पाण्याचे हौद लागतात. या वाटेवरून खाली गेल्यावर केदार दरवाजा लागतात. पडझडी मुळे आज हा दरवाजा वापरात नसला तरी पूर्वी या दरवाजाला फार महत्त्व होते. पद्मावती तळे : मुरारबाजींच्या पुतळ्यापासून थोडे पुढे गेल्यावर

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964

पद्मावती टके लागतात.

## * शेंद्र्या कुळण :-

पद्मावती टक्याच्या मागे बालेकिल्ल्याच्या पायथ्येस, तटबंदीच्या बरोबरीने एक कुळण बांधला आहे. त्याचे नाव शेंद्र्या कुळण.

## * पुरंदरेश्वर मंदिर :-

हे मंदिर महादेवाचे आहे. मंदिरात इंद्राची सव्वा ते दीड फुटापर्यंत मूर्ती आहे. हे मंदिर साधारणपणे हेमाडपंथी बांधणीचे असावे. थोरल्या बाजीरावाने या मंदिराचा जीर्णोद्धार केला

## * दिल्ली दरवाजा :-

हा उत्तराभिमुख दरवाजा ~~असे~~ आहे. दरवाज्याच्या वरावर श्री लक्ष्मी मातेचे देवालये आहे. दरवाजा बऱ्यापैकी सुस्थितीत आहे. या दरवाज्यातून आत गेल्यावर काही उजवीकडे आणखी एक दरवाजा दिसतो. डावीकडची वाट बालेकिल्ल्याच्या दुसऱ्या टोकापर्यंत जाते. या वाटेने पुढे गेल्यावर काही पाण्याच्या टाकी लागतात. याशिवाय या भागात बघण्यासारखे काही नाही. आल्या मार्गाने दिल्ली दरवाज्यापाशी यावे. समोरच उजवीकडे असणाऱ्या दरवाज्याने पुढे यावे. येथून पुढे गेल्यावर आणखी एक दरवाजा लागतो. या दरवाज्यावर दोन्ही बाजूस सिंहाच्या प्रतिकृती आढळतात.

## * केदारेश्वर :-

२० मिनीटात केदार दरवाजा पाहून आपण मूळ वाटेला लागू शकतो. या वाटेने १५ मिनीटे चालून गेल्यावर काही पायऱ्या लागतात. त्या आपल्याला थेट केदारेश्वराच्या मंदिरापर्यंत जिर्णोद्धार केलेला आहे. महाशिवरात्रीला हजारो भाविक यांच्या दर्शनाला येतात. मंदिराच्या समोरच एक दगडी दीपमाळ आहे. सभोवती दगडी फरसबंदी आहे. केदारेश्वराचे मंदिर म्हणजे किल्ल्यावरील अत्युच्च भाग. येथून राजगड, तोरणा, सिंहगड, रायरेश्वर, रोहिडा, मल्हारगड हे किल्ले पठार हा सर्व परिसर

ESTD JUNE 1964 (Autonomous)

Rajdhani
DATE / /

दिसतो. या केदार टेकडीच्या मागे एक बुरूज आहे. त्याला कोकण्या बुरुज असे म्हणतात.

★ **पुरंदरची माची :-**

आल्या वाटेने माघारी फिरून दिल्ली दरवाज्यावरून जाणाऱ्या वाटेने थेट पुढे यावे. म्हणजे आपण माचीवरील भैरवखिंडीत जाऊन पोहचतो. वाटेत वाड्यांचे अनेक अवशेष दिसतात.

★ **भैरवखिंड :-**

याच खिंडीवरून वज्रगडावर जाण्यासाठी वाट आहे. खिंडीत शिवाजी महाराजांचा पुतळा आहे. या खिंडीपर्यंत गाडी रस्ता आला असल्याने त्या रस्त्यावरून चालत गेल्यावर वाटेवरच उजवीकडे राजाळे तलाव लागतो. सध्या पुरंदरमाचीवर याच तलावाचे पाणी वापरले जाते.

★ **वीर मुरारजी :-**

बिनीदरवाज्यातून आत शिरल्यावर उजवीकडे गेल्यावर समोरच वीर मुरारबाजीचा पुतळा दिसतो. इ.स १९७० मध्ये हा पुतळा उभा केला.

संपुर्ण गड फिरण्यास फिरण्यास एक दिवस लागतो. पुरंदर सोबत वज्रगड देखील पहायचा असल्यास दीड दिवस लागतो.

★ **गडावर जाण्याच्या वाटा :-**

पुरंदर किल्ल्यावर जाण्यासाठी दोन वाटा आहेत.

1] **पुण्याहून :-**

पुण्याहून ३० कि.मी अंतरावर असणाऱ्या सासवड या गावी यावे. सासवड ते नारायणपूर ही अशी एस.टी सेवा देखील उपलब्ध आहे. नारायणपूर हे किल्ल्याच्या पायथ्यालाच गाव आहे. गावातूनच गाडी रस्ता थेट किल्ल्यापर्यंत गेलेला आहे. पुणे ते नारायणपूर बससेवा देखील उपलब्ध आहे. नारायणपूर गावातून गडावर [illegible] मार्ग आहेत. एक म्हणजे

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

गाडी रस्ता. या रस्त्याचे गड गाठण्यास २ तास पुरतात. तर दुसरी म्हणजे जंगलातून जाणारी पायवाट. या पायवाटेने एका तासात आपण पुरंदर माचीवरील रंगा किंदिस्वकप्यापशी पोहचतो.

## २) सासवडहून :-

किल्ल्यावर जाणारी दुसरी वाट जरा आडमार्ग आहे. सासवडहून सासवड - बोर गाडी पकडावी. या गाडीने नारायणपूर गावाच्या पुढे असणाऱ्या 'पुरंदर घाटमाथा' या थांब्यावर उतरावे. हा घाटमाथा म्हणजे पुरंदर किल्ला आणि समोर असणाऱ्या सूर्यपर्वत यामधील खिंड होय. या थांब्यावर उतरल्यावर समोरच्या डोंगरावर एक दोन घरे दिसतात. या घरामधूनच एक पायवाट डावीकडे वर जाते. ही पायवाट पुढे गाडीरस्त्याला जाऊन मिळते. या वाटेने पाऊण तासात पुरंदर माचीवरील बिनीदरवाजा गाठता येते.

★ किल्ल्यावर मिलिटरीचे बंगले आहेत. यामध्ये राहण्याची सोय होऊ शकते. मात्र त्यासाठी तेथे असणाऱ्या ऑफिसरची परवानगी घेणे आवश्यक आहे.

★ किल्ल्यावर जेवणाची सोय स्वतःलाच करावी लागते. पाण्याची सोय मात्र बारमाही उपलब्ध आहे.

★ किल्ला चढून जाण्यासाठी पायथ्यापासून साधारण १ तास लागतो.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(AUTONOMOUS)

Rajdhani

DATE / /


सह्याद्रीच्या दक्षिणोत्तर पसरलेल्या एक रांगेत काही फाटे पूर्व दक्षिणेकडे फुटले आहेत. त्यापैकी एका फाट्यावर सिंहगड आहे. तोच फाटा पुढे पूर्वेकडे आदमासे २४ किलोमीटर धावून भुलेश्वर जवळ लोप पावतो. याच डोंगररांगेवर पुरंदर आणि वज्रगड पसरलेले आहेत. कात्रज घाट, बापदेव घाट, दिवे घाट हे तीन घाट ओलांडून पुरंदरच्या पायथ्याशी जाता येते. किल्ल्याच्या चौफेर मोठ्या आहेत. किल्ला पुण्याच्या आग्नेय दिशेला अंदाजे २० मैलावर तर सासवडच्या नैऋत्येला ६ मैलांवर आहे. गडाच्या पूर्वेला बहुतांशी प्रदेश सपाट आहे तर पश्चिमेला डोंगराळ प्रदेश आहे. वायव्येला १२-१४ मैलावर सिंहगड आहे. तर पश्चिमेला १८-२० मैलांवर राजगड आहे.

पुरंदर किल्ला तसा विस्ताराने मोठा आहे. किल्ला मजबूत असून बचावाला जागा उत्तम आहे. गडावर मोठी शिबंदी राहू शकते. दारुगोळा व धान्याचा मोठा साठा करून गड दीर्घकाळ लढवता येऊ शकतो. असे. एक बाजू सोडली तर गडाच्या इतर सर्व बाजू दुर्गम आहेत. गडावरून सभोवारच्या प्रदेशावर बारिक नजर ठेवता येते

## इतिहास

पुरंदर म्हणजे इंद्र.

VIVEKANAND COLLEGE KOL... ESTD JUNE 1964 (Autonomous)



# संशोधन पद्धती

- इतिहास विभागाच्या किल्ले या पर्यटन स्थळांचा अभ्यास करत असताना ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Rajdhani
DATE / /

# निष्कर्ष

1] या प्रकल्पामुळे मला किल्ले पुरंदर ची माहिती मिळाली. व त्या किल्ल्यावर असणाऱ्या ठिकाणांची मला माहिती मिळाली

2] तसेच किल्ले व गड हे पर्यटन असुन, ती एक ऐतिहासिक वारसा देखील आहेत. व त्याचे जतन केले पाहिजे ही गोष्ट माझ्या लक्षात आली.

3] या प्रकल्पामुळे मला किल्ले व गडांची माहिती व महत्त्व लक्षात आले.

4] इतिहास विषयात किल्ले व गडांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे.

5] या प्रकल्पामुळे किल्ले व गडांविषयी लोकांचा असणारा दृष्टिकोन माझ्या लक्षात आला

# संदर्भ ग्रंथ


**वेबसाईट :-**

WWW. historical Place.com

भारतीय शब्दकोश
लेखक - प्रो. आर.एस शर्मा

अर्लि इंडिया
लेखिका - रोमिला थारप

WWW.Marathi.com./Purandar-Fort
[चित्रे व नकाशे]